# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०७/२०१७

**१) आलमारीत ठेवलेली लेडीज रिस्ट वॉच टायटन कंपनीची चोरून नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २६/०७/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराचे किचन रूमची खिडकिचे ग्रिल काढुन आत प्रवेश करून घरातील आलमारीतील एक लेडीज रिस्टवॉच टायटन कंपनीची कि. २५००/रु ची चोरून नेल्याने फिर्यादी शेखर हरीदास नाईक वय ५७ वर्ष रा. सिव्हील वार्ड भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो. स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) लोखंडी सामानाची चोरी . :–**

दिनांक २२/०७/२०१७ चे १८.०० वा ते २३/०७/१७ चे ०६.०० वा. दर. यातील आ.एन. टी शाळा सितासावंगी चे आवारात बसलेला १ लोखंडी झुला अंदाजे १०० किलो पाण्याचे टाकीला लावलेला , लोखंडी पाईप १५ फुट असा एकुन ६,०००/रु चा कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरून नेल्याने फिर्यादी श्रीमती मंगला नागेंद्र हटरवार वय ४९ वर्ष मुख्यधापीका आ.एन. टी शाळा सितासावंगी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**३) सोन्याच्या दागिण्याची चोरी . :–**

दिनांक २६/०७/२०१७ चे १३.०० ते १४.४० वा. दर. यातील फिर्यादी मनोहर आत्माराम राऊत वय ६३ वर्ष रा. गोंडउमरी यांचे भाऊ सुनेचे घरी समोरील दाराला लॉक लावले असुन मागील दार टेकुन ठेवले असता कोणीतरी अज्ञात चोराने मागील दार ढकलुन आत प्रवेश करून, टिनाचे आलमारीतील लॉकरमधील २ नग गरसुली ज्यात १ सोन्याचा डोरला, मनी व काळया मनी ओवलेली जुनी वजन अंदाजे ११ ग्रम , सोण्याच्या १ जोड बि–या ४ ग्रम, सोण्याचा लॉकेट १ ग्रम, १ सोन्याचा खडा, असा एकुन २७,५००/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ह.वा. परसुरामकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अवैधरित्या जनावंराना कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०७/२०१२ चे १९.३० वा.ते १९.४५ वा दर. यातील फिर्यादी हे पोलीस स्टॉपसह पेट्रोलींग करीत असता मुखबीर कडुन माहीती मिळाली की, यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रकमध्ये अवैध रित्या जनावरे भरून येत आहेत, अशा खबरे वरून झिरी रोडने पेट्रोलींग करीत असतांनी यातील ट्रक येतांनी दिसल्याने त्यास थांवीले असता यातील आरोपी ट्रक चालकाने ट्रक थांबवुन ट्रक सोडुन पळुन गेला, व ट्रकचा डाला उघडुन पाहीला असता, ट्रक मध्ये एकुन ३५ गोरे अवैधरित्या अपु–या जागेत कोंबुन जनावंराना त्रास होईल अशा स्थितीत वाहतुक करीतांनी मिळुन आल्याने सरतर्फे पो.उ.पनी. ताराम यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे जवाहरनगर येथे कलम २८९ भादंवि. सहकलम ११(१)(ख)(ड) प्राण्यांना क्रूरतेने वागविण्याचा प्रतिबंधक कायदा सन १९६० सहकलम ११९ म.पो.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उ.पनी. ताराम तपास. पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २५/०७/२०१७ चे १४.४० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी कोणीही हजर नसतांनी घरून निघुन गेली परत आली नाही तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले असावे, असा संशय फिर्यादीने व्यक्त केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास म.पो.उ.पनी.आडे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) रात्रीचे अंधारात अस्तित्व लपवुन संशयास्पद रित्या मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०७/२०१७ चे ०३.२५ वा. दर. यातील आरोपी हा रात्रीचे अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखल पात्र गुन्हा करण्याच्या बेतात असतांना संशयास्पद रित्या मिळुन आल्याने पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १२२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. ऊईके पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**७) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २५/०७/२०१७ चे २३.४५ वा. दर. यातील मृतक दिलीप शिवचरण कावळे वय ५४ वर्ष रा. शहिद वार्ड भंडारा याची प्रकृती बिघडल्याने तो औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे भरती असतांना मृतक हा दि.२५/०७/२०१७ २२.४५ वा. दर. रूग्नालयात बाथरूम मध्ये पडला असता त्याची प्रकृती बिघडल्याने दि. २५/०७/२०१७ ला २३.४५ वा. मरण पावल्याने मृतकचे मुलाचे बयाण तसेच सरतर्फे पो.ना उराळे यांचे रिपोर्ट व डॉ. रिपोर्ट वरून वरुन पो. स्टे. भंडारा येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कंन्नाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) विहीरीचे पाण्यात उुडी घेवुन मुलीचा मृत्यु . :–**

दिनांक २६/०७/२०१७ चे ०६.०० वा. दर.ते ०९.४५ वा.दर. यातील मृतक कु. कोमल जिवन मोहुर्ले वय १९ वर्ष रा. शिवाजी चौक अडयाळ याने घरा शेजारील आंभीलकर यांचे विहीरीत कुदुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी जिवन बकाराम माहुर्ले वय ५३ वष रा. शिवाजी चौक अडयाळ यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डोंगरे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत

**९) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक २६/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे करडी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हे दाखल करून १२ लिटर हा.भ. दारू किंमती ६००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २६/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६४ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.